# APPENDICES

# APPENDIX A

A list of origional statements sent to the Judges with the forwarding letter.

श्री. अजयकुमार भीमराव पाटील
'निकेत' प्लॉट नं. ५७,
संभाजी कॉलनी,
टिंबर एरीया, सांगली.
दिनांक :

प्रति,

मा. प्रा. ———————————
———————————

महोदय,

मला आपणास कळविण्यात आनंद होतो की, मी शिक्षणशास्त्र या विषयात एम्. फील. पदवी साठी डॉ. ए. जे. यादव, प्रपाठक, आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी, जि. कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करीत आहे.

माझ्या संशोधनाचा हेतू शिक्षक प्रशिक्षणार्थींची भावनिक बुद्धिमत्ता व त्यांची शैक्षणिक संपादणूक यामधील सहसंबंधाचा अभ्यास करणे हा आहे. संशोधनचा एक भाग म्हणून मी भावनिक बुद्धिमत्ता चाचणी तयार करीत आहे.

आपल्याशी संपर्क साधण्याचा उद्देश असा की, ही चाचणी तयार करण्यासाठी मला आपल्या अनुभवाचा फायदा व्हावा व आपले बहुमोल मार्गदर्शन मिळावे. तरी आपणास माझी अशी विनंती आहे की, माझ्यासाठी आपण आपला थोडा बहुमुल्य वेळ खर्च करावा. कारण तुमच्या बहुमोल मार्गदर्शनावरच माझे संशोधन आकार घेणार आहे.

भावनिक बुद्धिमत्तेची डॅनिअल गोलमन यांनी एकूण पाच क्षेत्रे सांगितली आहेत. त्या प्रत्येक क्षेत्रातील दोन घटकांचा विचार संशोधनासाठी केलेला आहे. ते घटक खालील प्रमाणे,

| क्षेत्र | घटक |
|---|---|
| 1) Self Awearness (स्वजाणीव) | i) Accurate Self Assessment (स्वत:चे अचूक मापन)<br>ii) Self – confidence (आत्माविश्वास) |
| 2) Self Regulation (स्वयं--शिस्त) | iii) Self- Control (स्व—नियंत्रण)<br>iv) Conscientiousness (सद्सद्विवेक) (कर्तव्यदक्ष) |
| 3) Motivation (प्रेरणा) | v) Initiative (पुढाकार)<br>vi) Optimism (आशावादी) |
| 4) Empathy (दुसऱ्याचे अनुभव अनुभवण्याची पात्रता) | vii) Understanding others (दुसऱ्यास समजून घेणे)<br>viii) Developing Others (दुसऱ्याच्या विकासाचा ध्यास) |
| 5) Social Skills (सामाजिक कौशल्य) | ix) Communication (संप्रेषण)<br>x) Leadership (नेतृत्व) |

वरील प्रत्येक घटकाच्या संबंधी विधानांची यादी सोबत जोडलेली आहे. कृपया ती वाचून विधानांचे मूल्यमापन करावे. हे मूल्यमापन करीत असताना पुढील मुद्दयांचा विचार करावा.

प्रत्येक विधान वाचून ते विधान संबंधित घटकाला अनुसरुन आहे का? हे पहावे विधान योग्य वाटल्यास त्या विधानाला बरोबर चिन्ह करावे. विधान अयोग्य वाटल्यास, त्याच्यासमोर अयोग्य असे लिहावे. व त्यामध्ये काय सुधारणा आवश्यक आहे हे त्याठिकाणी नमूद करावे. तसेच प्रत्येक विधानाची भाषाशैली शब्द रचना योग्य आहे का ते पहावे. नसल्यास त्या ठिकाणी दुरुस्ती करावी. किंवा विधान दुरुस्त करुन मोकळया जागेत पुन्हा लिहावे. प्रत्येक घटकाच्या तुम्हास योग्य वाटतील अशा सहा विधानांना एक ते सहा पसंती क्रमांक दयावेत. तसेच चाचणी परिपूर्ण होण्याच्या दृष्टीने आपणास कांही सूचना करावयाच्या असतील किंवा कांही नवीन विधाने सुचवायची असतील तर प्रत्येक घटकाच्या शेवटी सूचना किंवा

विधाने लिहावित व शेवटी नानणी संबंधी एक प्रश्नावली जोडली आहे ती भरावी.

मी पुन:श्च आपणास विनंती करतो की, विधानांचे मूल्यमापन करुन ती कृपया लवकरात लवकर पाठवावित. त्यासाठी सोबत माझा पत्ता लिहिलेला व पोष्टेज लावलेला लिफाफा पाठवित आहे.

कळावे,
आपला विश्वासू

## I. स्वत:चे अचूक मापन

स्वत:च्या क्षमतांचे वास्तववादी मूल्यमापन करणे, स्वत:च्या भावना, अभिरुची, बलस्थाने, कमतरता जाणणे व त्यानुसार काम करण्याची पद्धती अनुसरणे.

आपण काय करु शकत नाही याची जाणीव असणे, केलेल्या कार्याचे मूल्यमापन करणे, भावना ओळखणे व त्याची तीव्रता ठरविणे, स्वत:च्या वैशिष्टयांचे मूल्यमापन करणे, स्वत:ची योग्यता ओळखणे.

१. नवनवीन अध्यापन पद्धतीबाबत तुम्ही जागरुक असता.
(अध्यापन विषयक अभिरुची) (धन)

२. स्वत:मध्ये असणाऱ्या अध्यापन कौशल्यांची तुम्हाला जाणीव आहे.
(क्षमता जाणणे) (धन)

३. स्वत:च्या कामकाजाचे अधूनमधून मूल्यमापन करता.
(कार्याचे मूल्यमापन) (धन)

४. आपण काय करु शकतो किंवा काय करु शकत नाही याची जाणीव असण्याची तुम्हाला गरज वाटत नाही.
(बलस्थाने कमतरता न जाणणे) (ऋण)

५. आपण स्वत: आपल्या दोषांचे मूल्यमापन करता.
(स्वत:चे मूल्यमापन) (धन)

६. माझ्या भावना लवकर दुखावल्या जातात.
(भावनांची तीव्रता ठरविणे) (ऋण)

७. स्वत:तील त्रुटींचा स्वीकार करणे तुम्हाला अवघड जाते.
(स्वत:चे निरीक्षण ) (ऋण)

८. मला संधीचा योग्यप्रकारे वापर करुन घेता येत नाही.
(स्वत:चे निरीक्षण ) (ऋण)

९. तुम्ही अधून मधून उदास, निरुत्साही, मरगळलेले असता.
(भावना जाणणे) (ऋण)

१०. स्वत:ची आवड, निवड व कुवत लक्षात घेऊनच मी काम करण्याची पद्धती अनुसरतो.
(बलस्थाने जाणून काम करण्याची पद्धती अनुसरणे) (धन)

## II. आत्मविश्वास

आत्मविश्वास हा स्वत:च्या सादरीकरणातून उघड होतो. किंवा व्यक्तिमत्वाच्या प्रक्षेपणातून व्यक्त होतो. भक्कम आत्मविश्वास असणारी माणसे सभोवतालच्या माणसांमध्ये आत्मविश्वास जागविण्याचा प्रयत्न करतात.

त्यांच्यामध्ये उत्कट इच्छा, स्वावलंबी, अडचणींना तोंड देण्याची तयारी, स्वत:संबंधी ज्ञान, जबाबदारी घेण्याची तत्परता निर्णयक्षमता, स्वत:वर विश्वास, आशावादी दृष्टीकोन, स्वत:च्या क्षमतेसंबंधी सकारत्मक मत असते. स्व—सामर्थ्य व आत्मविश्वास यांचा जवळचा संबंध आहे.

१ तुमच्या वरिष्ठांसमोर त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला माहित असूनही ती देताना तुम्ही अडखळता.
(स्वत:वरील विश्वासाचा अभाव) (ऋण)

२ तुम्ही खूप विचारपूर्वक निर्णय घेता आणि एकदा घेतलेला निर्णय सहसा बदलत नाहीत.
(निर्णय क्षमता) (धन)

३ तुम्ही एखादया कामातील मुख्य जबाबदारी घेण्याचा नेहमी प्रयत्न करता.
(जबाबदारी घेण्याची तत्परता) (धन)

४ तुम्ही एखादे अवघड ध्येय ठरवून ते गाठण्यासाठी प्रयत्न करता.
(उत्कट इच्छा) (धन)

५ तुम्ही दु:खी असताना तुम्हाला नेहमी सोबत लागते.
(परावलंबी) (ऋण)

६ तासाला जाण्यापूर्वी तुम्ही अस्वस्थ होता.
(स्वत:वरील विश्वासाचा अभाव) (ऋण)

७ एखादया कामात अडचणी आल्या की ते काम अर्धवट सोडून देण्याचा विचार तुमच्या मनात येतो.
(अडचणींना तोंड देण्याची तयारी नसणे) (ऋण)

८ कोणतेही काम करीत असताना ते काम मी यशस्वीरित्या पूर्ण करेन असा विश्वास तुम्हाला नेहमी वाटतो.
(स्वत:च्या क्षमतेसंबंधी सकारात्मक मत) (धन)

९ सहकाऱ्यांना प्रोत्साहन देऊन, कौतुक करुन, अभिनंदन करुन सहकाऱ्यांच्यामध्ये आत्मविश्वास जागविण्याचा तुम्ही नेहमी प्रयत्न करता.
(आत्मविश्वास जागविण्याचा प्रयत्न) (धन)

१० समूह चर्चा किंवा सादरीकरणाच्या वेळेस तुम्ही आत्मविश्वासाने त्यामध्ये भाग घेता.
(आत्मविश्वास) (धन)

## III. स्व—नियंत्रण

स्व—नियंत्रण म्हणजे भावनांचे योग्य व्यवस्थापन करणे. मोहापासून दूर रहाणे, तणाव नियंत्रण, राग योग्य रितीने व्यक्त करणे, कमी आक्रमक भावनांवर नियंत्रण व मर्यादा ठेवणे आणि शिस्तबद्ध कृती करणे, सबुरीने घेणे, विचार न करता कृती करण्याच्या इच्छेवर नियंत्रण ठेवणे, स्थितप्रज्ञ, दोलायमान अवस्थेत ही तोल जाऊ न देता नियंत्रण करण्याची शक्ती होय.

इच्छाशक्तीचा विकास म्हणजेच आत्मसंयमनाचा विकास होय.

१. ज्या वेळी विदयार्थी तासाला दंगा करतात त्या वेळी तुम्ही संयमाने ती परिस्थिती हाताळता.
(सुबरीने घेणे) (धन)

२. सहकाऱ्याने तुमच्या विषयी गैरसमज पसरवला ही गोष्ट समजल्यानंतर तुमच्या मनात त्याच्या विषयी व्देषाची भावना निर्माण होते.
(राग योग्यरितीने व्यक्त न करणे) (ऋण)

३. ज्यावेळी तुमची योग्य अशी गोष्ट तुमचे सहकारी मान्य करीत नाहीत त्यावेळी तुम्ही आक्रमक होता.
(आक्रमक होणे) (ऋण)

४. एखादया कार्यात अयशस्वी होण्याच्या कल्पनेने तुम्ही बैचेन होता.
(भावनांचे व्यवस्थापन नसणे) (ऋण)

५. तुमच्या पात्रतेपेक्षाही जास्त कुणी तुमची स्तुती केली तर त्याने ती चूकून केली असेल असे तुम्हाला वाटते.
(मोहापासून दूर) (धन)

६. स्वमत, भावना इ. वर नियंत्रण ठेऊन शिक्षकाच्या आचार संहितेतील सर्व नियमांचे योग्य पालन करता.
(भावनांवर नियंत्रण ठेऊन शिस्तबद्ध कृती करणे) (धन)

७. अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तुमच्या अध्यापनात फरक पडतो.
(तणाव नियंत्रणाचा अभाव) (ऋण)

८. तुम्हाला दोलायमान अवस्थेत ही तोल जाऊ न देता स्थितप्रज्ञ राहाणे जमते.
(स्थितप्रज्ञ) (धन)

९. एखादी कृती करताना त्यासंबंधी विचार न करता भावनेच्या भरात तुम्ही ती कृती करता.
(विचार न करता कृती करण्याच्या इच्छेवर नियंत्रण नसणे) (ऋण)

१०. तुमच्याकडे जबरदस्त इच्छाशक्ती आहे.
(इच्छाशक्तीचा विकास) (धन)

## IV. कर्तव्यदक्ष, सद्सद्विवेक

व्यक्ती ज्या समाजाचा घटक आहे. त्यामधील नैतिक तत्वांना त्याने दिलेला प्रतिसाद व वर्तन विषयक अपेक्षित रीत ह्या वेगवेगळया अर्थाने ही संज्ञा वापरली जाते.

नियमावलीचा उगम व स्वरुपाची जाणीव असणे, स्वतःच्या कृती व हेतू यांचे मूल्यमापन करता येणे, अयोग्य वर्तन टाळणे, उपकाराचे ऋण जाणणे, अपराधीपणा व पश्चातापाची भावना असणे, शिक्षा किंवा बाहय दबाव नसतानाही चांगले वर्तन करण्याची प्रवृत्ती, भावना व कृती यातील फरक जाणणे. तसेच केलेल्या कार्याची जबाबदारी स्वीकारणे.

सद्सद्विवेक बुद्धी मनाची एक विकसित झालेली नैतिक बुद्धी आहे. त्यामुळे चांगले कोणते व वाईट कोणते यात फरक करता येतो.

१. राष्ट्रीय समस्यांबाबत जागरुक असता व त्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने स्वतःचे योगदान देता.
(सामाजिक वर्तन विषयक अपेक्षित रित) (धन)

२. तुम्ही केवळ वैयक्तिक ध्येयांकडे लक्ष केंद्रित न करता सामाजिक ध्येय देखील विचारत घेता.
(उपकाराचे ऋण जाणणे) (धन)

३. नैतिक मूल्यांच्या आधारेच खरा शिक्षक घडतो असा तुमचा विश्वास आहे.
(नैतिक तत्वांना दिलेला प्रतिसाद) (धन)

४. राजकारण या सारख्या गोष्टींमध्ये आपला वेळ खर्च न करता तुम्ही अधिकाधिक वेळ हा अध्यापनासाठी खर्च करता.
(अयोग्य वर्तन टाळणे) (धन)

५. सहकाऱ्याने केलेल्या मदतीचा तुम्हास कधीच विसर पडत नाही.
(उपकाराचे ऋण जाणणे) (धन)

६. एखादी कृती करण्यापूर्वी तुम्ही त्यामागील हेतूंचे मूल्यमापन करता.
(हेतूचे मूल्यमापन करणे) (धन)

७. कोणताही बाहय दबाव नसताना कठीण प्रसंगी अनैतिक कार्य करता/कामा नये असे आपणास वाटते.
(बाहय दबाव नसताना चांगले वर्तन) (धन)

८. आपण केलेली चूक आपण स्वत:मान्य करणे तुम्हाला कमीपणाचे वाटते.
(अपराधीपणाची भावना नसणे) (ऋण)

९. एखादया गोष्टीतील चांगल्या व वाईट बाबी यामध्ये तुम्हाला फरक करता येत नाही.
(चांगले वाईट यामध्ये फरक करता न येणे) (ऋण)

१०. चार चौघांत कांहीही बोलण्यापूर्वी आपण जे बोलणार ते योग्य आहे का नाही याचा नीट विचार करता.
(कृती करण्यापूर्वी तीचे मुल्यमापन करणे) (धन)

## V. पुढाकार

स्वतंत्रपणे काम करण्याची क्षमता, दुसऱ्यांच्या मदतीशिवाय किंवा सल्लयाशिवाय काम करण्याची किंवा निर्णय घेण्याची क्षमता, समस्या सोडविण्याच्या उद्देशाने नियोजन करणे किंवा कार्यनिती आखणे. अवघड कामामध्ये मानसिक धैर्य खचू न देणे तसेच [illegible] विधायक रितीने तोंड देणे, काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे, आपली ध्येयें, उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील असणे.

१. तुमच्यावर सोपवलेले काम तुम्ही इतरांच्या मदतीशिवाय पूर्ण करता.
   (स्वतंत्रपणे काम करण्याची क्षमता) (धन)

२. एखादी समस्या सोडविण्यासाठी त्यावर सखोल चिंतन करुन समस्या सोडविण्याची कार्यनिती तयार करता.
   (समस्या सोडविण्यासाठी कार्यनिती आखणे) (धन)

३. इतरांच्या सल्लयाशिवाय आपण कांही महत्वाचे निर्णय घेता.
   (इतरांच्या सल्लयाशिवाय निर्णय घेण्याची क्षमता) (धन)

४. स्वतःची ध्येये, उद्दिष्टे ठरवून प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील असता.
   (ध्येये, उद्दिष्टे, प्राप्त करण्याची क्षमता) (धन)

५. अवघड कामामध्येही स्वतःचे धैर्य खचू न देता ते काम पूर्ण करता.
   (मानसिक धैर्य खचू न देणे) (धन)

६. हाती घेतलेले काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करता.
   (कामपूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा) (धन)

७. वर्गामध्ये शिस्तप्रस्थापित करण्यासाठी तुम्ही स्वतः शिस्तीने वागता.
   (पुढाकार घेणे) (ऋण)

८. प्रत्येक लहान—महान कामात तुम्हाला इतर लोकांनी मदत घ्यावी लागते.
(दुसऱ्याची मदत घेणे) (ऋण)

९. अवघड प्रसंगात नेमका कोणता मार्ग निवडावा हे तुम्हाला सहज सांगता येते.
(समस्या सोडविण्यासाठी योग्य नियोजन) (धन)

१०. शिक्षकाने स्वतःच्या चारित्र्याचा आदर्श विदयार्थ्यांसमोर उभा केला पाहिजे असे तुम्हाला वाटते.
(पुढाकार घेणे) (धन)

११. शिक्षकाने वेळेवर आपले काम करुन तो आदर्श विदयार्थ्यांना पुढे ठेवावा असे आपणास वाटते.
(पुढाकार घेणे) (धन)

## VI. आशावाद

आशावाद म्हणजे जीवनाकडे किंवा जगाकडे व भविष्यातील घडणाऱ्या गोष्टींकडे पहाण्याचा एक सकारात्मक दृष्टिकोन होय.

आशावादी, समाधानी, ध्येयवादी, उत्साही, सभोवताली घडणाऱ्या घटनांच्या बाबतीत सजग असणारा व त्याची जाणीव असणारा, सकारात्मक अपेक्षा ठेवणारा, अवघड परिस्थितीतही आशावादी असणारा, अपयशाकडेही सुधारता येणारी चुक अशा दृष्टीने पहाणारा या लक्षणांचा समावेश यामध्ये होतो.

१. तुम्हाला अध्यापनाचे कार्य करताना अनंत अडचणी येतात त्या वेळी तुम्ही निराश होता.
(निरुत्साही) (ऋण)

२. शैक्षणिक वातावरण कसेही असो, शिक्षकाने ठरविले तर तो आपल्याला अनुकूल असे वातावरण निर्माण करु शकतो
(ध्येयवादी) (धन)

३. शिक्षकाने नैतिक, सामाजिक, सांस्कृतिक मूल्यांच्या बाबतीत चिंता करु नये.
(सभोवताली घडणाऱ्या घटनांच्या बाबतीत सजग नसणे) (ऋण)

४. जर शिक्षकाने सुनियोजित असे काम केले तर अनेक शैक्षणिक समस्यांचे निराकरण होऊ शकते.
(सकारत्मक अपेक्षा ठेवणारा) (धन)

५. विदयार्थ्यांच्या केवळ अध्ययन विषयक समस्यापूर्तीसाठीच नव्हे तर त्यांच्या दैनंदिन अडचणीसाठी देखील शिक्षकाने दिलेले शिक्षण त्यांना उपयुक्त ठरेल अशी आशा शिक्षकाने बाळगली पाहिजे.
(आशावादी) (धन)

६. शिक्षकी पेशाबाबत मी समाधानी आहे.
(समाधानी) (धन)

७. कोणत्याही कामात अपयश आल्यावर अपयश ही यशाची पहिली पायरी असते असे मानून तुम्ही पुन्हा नव्या जोमाने कामाला लागता.
(अपयशाकडेही सुधारता येणारी चूक अशा दृष्टीने पहाणारा) (धन)

८. प्रत्येक वर्गात विदयार्थी संख्या क्षमतेपेक्षा अधिक असली तरी विविध अध्यापनाच्या पद्धती वापरुन शिक्षकाला आपले अध्यापन प्रभावी करता येते.
(अवघड परिस्थितीतही आशावादी असणारा) (धन)

९. जीवनात कांहीच अर्थ नाही असा विचार नेहमी तुमच्या मनात येतो.
(जीवनाकडे पहाण्याचा नकारात्मक दृष्टिकोन) (ऋण)

१०. कोणतेही काम करण्यापूर्वी त्याकामाचा कांहीच फायदा होणार नाही अशी तुमची भावना असते.
(नकारात्मक अपेक्षा ठेवणारा) (ऋण)

११. तुमचे भविष्य अंधकारमय आहे असे तुम्हाला वाटते.
(भविष्याकडे पहाण्याचा नकारात्मक दृष्टिकोन) (ऋण)

# VII. समजून घेण्याचे कौशल्य

समजून घेण्याचे कौशल्य म्हणजे दुसऱ्याच्या भावना ओळखणे, अडचणी जाणून घेणे, इतर व्यक्तिंच्या गरजा व भावनांना योग्य प्रतिसाद देणे, परस्पर विश्वास निर्माण करणे, इतरांच्या दृष्टिकोनातून परिस्थितीचा अंदाज घेणे, विविध लोकांबद्दल सहृदयात बाळगणे होय.

तसेच संभापण कौशल्य, दुसऱ्याचे दु:ख शांत करण्याची क्षमता, मूकभाव, आवाजाची छटा, शारीरिक हावभाव, चेहऱ्यावरील भाव ओळखण्याची क्षमता यांचा समावेश यामध्ये होतो.

१. विदयार्थ्यांना योग्य प्रकारे शिक्षण देण्यासाठी, विदयार्थ्यांच्या अडचणी समजून घेता व त्यादृष्टिने विदयार्थ्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न करता.
(अडचणी जाणून घेणे) (धन)

२. इतरांना समजून घेण्यासाठी तुम्ही स्वत:चा स्वभाव लवचिक बनविता.
(गरजा व भावनांना योग्य प्रतिसाद देणे) (धन)

३. दुसऱ्याचा मुद्दा आपण मांडलेलया मुद्दया इतकाच महत्वाचा आहे असे आपणास वाटते.
(इतरांच्या दृष्टिकोनातून परिस्थितीचा अंदाज घेणे) (धन)

४. महाविद्यालयातील सहकारी, कर्मचारी यांच्याशी अध्ययन अध्यापनापुरताच संबंध ठेवता.
(सहृदयता बाळगणे) (ऋण)

५. आपल्यापेक्षा कनिष्ठ सहकाऱ्यांना बरोबरीच्या नात्याने वागविता.
(परस्पर विश्वास निर्माण करणे) (धन)

६. विदयार्थ्यांच्या विचारांचा किंवा प्रस्तावांचा सन्मान करता.
(परस्पर विश्वास निर्माण करणे) (धन)

७. वारंवार गैरहजर राहाणाऱ्या सहकाऱ्याबाबत त्याच्या गैरहजेरीचे कारण जाणून घेण्यात रस दाखविता.
(सहृदयता बाळगणे) (धन)

८. दुसऱ्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरील भावनिक प्रतिक्रियांच्या आधारे त्याच्या मनात काय आहे हे ओळखू शकता.
(चेहऱ्यावरील भाव ओळखण्याची क्षमता) (धन)

९. एखादा जर तुमच्याशी अयोग्य रिताने वागला तरी तुम्ही त्याच्यावर विश्वास टाकून त्याला आणखी एखादी संधी देता.
(परस्पर विश्वास निर्माण करणे) (धन)

१०. तुम्ही नेहमी दुसऱ्याच्या दु:खात सहभागी होऊन त्याचे दु:ख कमी करण्याचा प्रयत्न करता.
(दूसऱ्याचे दु:ख शांत करण्याची क्षमता) (धन)

## VIII: दुसऱ्याच्या विकासाचा ध्यास

इतरांचा विकास होण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन करणे, समुपदेशकाची भूमिका करणे, इतरांच्या कमतरतांचा अंदाज घेऊन त्यांना योग्य प्रत्याभरण देणे. व्यावसायिक लाभ मिळविण्यासाठी सहकाऱ्यांना मदत करणे, निर्भिडपणे चुका दाखविणे.

१. शिक्षकाने विदयार्थ्यांना दैनंदिन अध्यापनाबरोबरच विदयार्थ्यामध्ये अशी भावना निर्माण केली पाहिजे की ज्या द्वारे विदयार्थी स्वत:ला ओळखू शकेल व स्वत:चे कार्य पार पाडण्यास प्रयत्नशील राहील.
(समुपदेशन करणे) (धन)

२. आपण आपले अध्यापन विषयक कार्य विदयार्थ्यांमधील व्यक्तिभेद लक्षात घेऊन करता.
(इतरांच्या कमतरतांचा अंदाज घेणे) (धन)

३. आपल्या विषयातील कच्च्या विदयार्थ्यांसाठी शाळेच्या वेळे-व्यतिरिक्त जादा तास घेऊन मार्गदर्शन करता.
(मार्गदर्शन करणे) (धन)

४. अध्यापनाच्या नियोजनात तुम्ही सहकाऱ्यांना मदत करता.
(सहकाऱ्यांना मदत करणे) (धन)

५. सहकाऱ्यांच्या व्यावसायिक विकासासाठी त्यांना चर्चासत्रे, सेमिनार, निबंधस्पर्धा इ. मध्ये भाग घेण्यास तसेच इतर शैक्षणिक कोर्सेस करण्यासाठी प्रवृत्त करता.
(व्यावसायिक लाभासाठी सहकाऱ्यांना मदत करणे) (धन)

६. सहकाऱ्यांच्या मध्ये असणारे दोष तुम्ही त्यांच्यापुढे परखडपणे मांडता.
(निर्भिडपणे चुका दाखविता) (धन)

७. विदयार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विदयार्थ्यांना सहशालेय कार्यक्रमात भाग घेण्यास प्रवृत्त करता.
(विदयार्थ्यांच्या विकासासाठी प्रयत्न करणे) (धन)

८. आपल्या अनुभवाचा फायदा आपण इतर सहकाऱ्यांना करुन देता.
(सहकाऱ्यांना मार्गदर्शन करणे) (धन)

९. संस्थेच्या प्रगतीसाठी, विकासासाठी नेहमी प्रयत्नशील असता.
(संस्थेच्या विकासासाठी प्रयत्न करणे) (धन)

१०. विदयार्थ्यांच्या दोषाकडे अधिक लक्ष पुरवून त्यांना चांगल्या कार्यासाठी प्रेरित करता.
(विदयार्थ्यांना प्रत्याभरण देणे) (धन)

# IX. संप्रेषण

लोकांशी भाषेद्वारे किंवा मूकपणे व ज्ञान, वृत्ती व प्रेरणा यांच्यातील बदलणाऱ्या फरकानुसार संदेशाची देवाण घेवाण करणे.

श्रवण व प्रश्न विचारण्याचे कौशल्य, एखादा काय करतो किंवा काय सांगतो आणि तुमचे त्या विषयावर असलेले मत व प्रतिसाद यात फरक करता येणे, परिणामकारक संप्रेषण, उत्तम प्रतिसाद देणे, मन वळविण्याचे तंत्र, स्वत:चे मत इतरांना पटवून देण्याची कला, मन मोकळा असणे व स्वत:च्या भावनांवर नियंत्रण असणे हे चांगला संदेशक होण्यासाठी जरुरी आहे.

१. मतभेदाच्या मुद्दयावर तुम्ही सहकाऱ्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करता.
(मन वळविण्याचे तंत्र) (धन)

२. विदयार्थ्यांने अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्न विचारला तर तो योग्य प्रकारे आपण ऐकून घेऊन त्याचे समाधान करता.
(उत्तम प्रतिसाद देणे ) (धन)

३. स्वत:चे विचार अंत्यत सहजतेने व योग्य रीतीने दुसऱ्याजवळ व्यक्त करता की जेणेकरुन ते विचार लोकांना सहज समजतील.
(परिणामकारक संप्रेषण) (धन)

४. स्वत:चे मत आपल्या वरिष्ठांना पटवून देण्याचा प्रयत्न करता.
(मत इतरांना पटवून देण्याची कला) (धन)

५. सहकाऱ्याने मांडलेला मुद्दा लक्षपूर्वक ऐकून घेऊन त्यावर विचार करता.
(श्रवण कौशल्य) (धन)

६. माझ्या व्यक्तिगत भावना मी इतरांसमोर नेहमी योग्य पध्दतीने प्रकट करतो.
(स्वत:च्या भावनांवर नियंत्रण असणे) (धन)

७. तुमचे स्वत:च्या रागावर नियंत्रण राहू शकते.
(स्वत:च्या भावनांवर नियंत्रण असणे) (धन)

८. तुम्ही मोठया माणसांप्रमाणेच लहान मुलांशी ही तितक्याच चांगल्या रितीने संवाद साधू शकता.
(फरकानुसार संदेशाची देवाण घेवाण करणे) (धन)

९. आपणाला हवी असलेली माहिती दुसऱ्याकडून मिळविण्यासाठी योग्य प्रश्न विचारण्याचे तंत्र तुम्हाला चांगले अवगत आहे.
(प्रश्न कौशल्य) (धन)

१०. तुम्हाला अशाब्दिक संवाद (मूक संवाद) चांगल्या रितीने साधता येतो.
(मूक संदेशाची देवाण घेवाण) (धन)

## X. नेतृत्व

नेता हा बुद्धिमान, उपक्रमशील, भावनिक परिपक्व जबाबदारीची जाणीव असणारा असावा. सभासदांशी त्याचे संबंध जिव्हाळयाचे असले पहिजेत. तो सर्वांना मदत करणारा सहकार्याची वृत्ती असणारा व लोकशाहीवादी असावा. त्याच्याजवळ प्रेरणा देण्याचे कौशल्य, समस्या सोडविण्याचे कौशल्य, प्रभावी वक्तृत्व, टिका सहन करण्याची तयारी, तडजोडीचे कौशल्य, संस्था, संघटनेच्या ध्येयाशी निष्ठा असली पाहिजे. घेतलेल्या निर्णयाची व केलेल्या कृतीचे परिणाम ओळखण्याची क्षमता असली पाहिजे.

१) तुमच्या एखादया कृतीवर तुमच्या सहकाऱ्याने विरोधी मत प्रकट केले तरी त्याकडे तुम्ही निर्मळ दृष्टीने पहाता.
(टिका सहन करण्याची तयारी) (धन)

२) संस्थेच्या ध्येयासाठी स्वहिताचा त्याग करण्याची जरुरी नसते.
(संस्थेच्या ध्येयाशी निष्ठा असावी.) (ऋण)

३) अयशस्वी झालेल्या उपक्रमाबाबत तुम्ही स्वतःपेक्षा इतरांना दोषी ठरविता.
(भावनिक अपरिपक्वता असणे.) (ऋण)

४) संभाव्य परिणामांच्या भीतीचा विचार करूनच आपण नेहमी स्वतःची मते व दृष्टिकोन ठामपणे प्रतिपादन करता.
(कृतीचे परिणाम ओळखण्याची क्षमता असणे.) (धन)

५) एखादा उपक्रम अयशस्वी झाल्यानंतर ही तशाच प्रकारचा दुसरा उपक्रम राबविताना तुमचा उत्साह कायम असतो.
(उपक्रमशीलता असणे) (धन)

६) स्वतःच्या वक्तृत्वशैलीने तुम्ही स्वतःचे मत सहकाऱ्याच्या अंतकरणावर ठसविता.
(प्रभावी वक्तृत्व) (धन)

७) उपक्रमातील सहभागी सदस्यांना प्रेरणा दिल्यामुळे उपक्रमाच्या यशाचे प्रमाण वाढते असे आपणास वाटते.
(प्रेरणा देण्याचे कौशल्य) (धन)

८) एखादया उपक्रमाच्या कार्यवाही बाबतीत नेत्यापेक्षा सदस्यांची जबाबदारी अंतिम असते असे आपणास वाटते.
(जबाबदारीच्या जाणिवेचा अभाव) (ऋण)

९) एखादया यशस्वी उपक्रमाबाबतचे सर्व श्रेय नेत्याचेच असते.
(लोकशाहीवादी अभाव) (ऋण)

१०) दोन सहकार्याच्यामधील वाद तुम्ही नेहमी तडजोडीने मिटवता.
( तडजोडीचे कौशल्य ) (धन)